# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Pudhari 23-02-2016**

# जीआयटीतर्फे २५ पासून 'ऑरा १६' संगीत महोत्सव



विशाल शेखर

बेळगाव : प्रतिनिधी कर्नाटक लॉ सोसायटी संचलित गोगटे अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे येत्या २५ ते २७ फेब्रुवारीपर्यंत ऑरा १६ या संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील गायक आणि अभिनेते सहभागी होणार आहेत. जीआयटी महाविद्यालयातर्फे दरवर्षी विविध उपक्रम हाती घेण्यात येतात. यावर्षी बॉलीवूडमधील डायरेक्टर आणि गायक विशाल व शेखर हे जीआयटी महाविद्यालयाला भेट देत आहेत. या दोघांनी ओम शांती ओम, दोस्ताना, चेन्नई एक्स्प्रेस, बाजीराव मस्तानी असे लोकप्रिय चित्रपट दिलेले आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने नाच, संगीत, ड्रामा आदी कार्यक्रम होणार आहेत. या शिवाय सुनिधी चौहान, फरहान अख्तर, शंकर महादेवन यांच्या गीतांचा कार्यक्रम होणार आहे. यासाठी जीआयटीचे चेअरमन, प्राचार्य आणि प्राध्यपकांचे सहकार्य लाभले आहे.